# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
## रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
## फोन नं ०२२-२९४५१००१
**Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेसनोट क्रमांक :- २३६ दिनांक :- ३१/०८/२०२१

## मोटार सायकलला कट लागल्याच्या कारणावरून तरुणाचा खून करण्या-या ८ आरोपीतांना काशिमिरा पोलीस स्टेशनकडून अटक.

दिनांक २९/०८/२०२१ रोजी रात्री ०९:०० वाजताचे सुमारास फॉर्च्युन हाईट्स बिल्डींगचे समोर हाटकेश मिरारोड पुर्व येथे काहि इसम त्यांचे मोटारसायकलला एका लाल टि शर्ट घातलेल्या इसमाने कट मारला या कारणावरुन त्याचा शोध घेत आले. तेव्हा सदर ठिकाणी शुभम भुवड वय-१८ (मयत) हा त्याचे मित्रांसोबत उभा होता तसेच शुभम भुवड (मयत) यानेही लाल रंगाचा टी शर्ट घातलेला असल्याने आरोपीत यांचे गाडीला कट मारणारा हा तोच इसम आहे असे समजुन यातील आरोपीतांनी वेगवेगळया वाहनांनी येवून मयत शुभम यास लाथा बुक्यांनी जबर मारहाण करून त्यास जिवे ठार मारले होते. सदर घटनेबाबत मयताचे वडिल श्री. शांताराम भुवड यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ३०/०८/२०२१ रोजी काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुरनं. I ५८४/२०२१ भादंवि कलम ३०२, १४३, १४७, १४९ प्रमाणे आरोपी नामे १) विनोद हिरालाल उपाध्याय वय-४४, २) आकाश दिलीप हिरवे वय-२५, ३) कुणाल दिलीप किणी वय-३३, ४) अमृत उर्फ सनी शशिकांत उपाध्याय वय-२५, ५) वसीम अल्ताफ शेख वय-३२, ६) मोहम्मद राजु इर्षाद शेख वय-३२, ७) जतीन विनोद उपाध्याय वय-२०, ८) सायस बाबुराव मुंढे वय-२० व इतरांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी क्र १ ते ८ अशांना अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपीतांना मा. न्यायालयाने दि ०३/०९/२०२१ रोजी पावेतो तपासकामी पोलीस कोठडी सुनावली आहे. तसेच यातील आरोपीतांनी गुन्हा करण्यासाठी वापरले वाहन व त्यांचे ताब्यातील इतर वस्तू तपासकामी जप्त करण्यात आलेल्या आहेत. सदर गुन्हा करण्यामागे मोटार सायकलला कट मारला, हेच कारण आहे अगर इतर कारण आहे याबाबत पुढिल तपास श्री. जितेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक, काशिमीरा पोलीस स्टेशन हे वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली करित आहे.

----ooo----